# आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक,
## राष्ट्रीय आरोग्य अभियान

सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे कार्यालय

NHM राष्ट्रीय आरोग्य अभियान महाराष्ट्र

दुरध्वनी – ०२२ – २२७१७५००
फॅक्स – ०२२ – २२६४२९५५
E-mail - mdnrhm.mumbai@gmail.com

आरोग्य भवन, ३रा मजला,
सेंट जॉर्ज रूग्णालय आवार, पी. डिमेलो रोड,
सीएसटी जवळ, फोर्ट, मुंबई ४००००१ ५४५८३-६५०


महत्वाचे

जा.क्र.राआसो/आरोग्यवर्धिनी/स.आ.अ./का.वे./ /२०
दिनांक ०६/१०/२०२०

प्रति,
जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद (सर्व)

**विषय-समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या कार्यालयीन वेळेबाबत.**

**संदर्भ-मा.आयुक्त आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांची दिनांक २१/०९/२०२० रोजीची मान्य टिपणी.**

केंद्र शासनाच्या आयुष्मान भारत योजने अंतर्गत आरोग्यवर्धिनी कार्यक्रमाच्या माध्यमातून राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्राचे आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये रुपांतरण करण्यात येत आहे. ग्रामीण भागातील जनतेला गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा व सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी उपकेंद्र स्तरावर समुदाय आरोग्य अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येत आहे. समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या उपकेंद्रस्तरावरील कार्यालयीन वेळेबाबत काही तक्रारी राज्य कार्यालयास प्राप्त झाल्या आहेत.

प्राप्त तक्रारीच्या संदर्भात संदर्भिय मान्य टिपणीच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या कार्यपध्दतीबाबत खालील नमूद बाबी आप-आपल्या जिल्हयातील कार्यरत सर्व समुदाय आरोग्य अधिकारी यांच्या निर्देशनास आणून दयाव्यात.

१.समुदाय आरोग्य अधिकारी हे पद पुर्णवेळ पद आहे.

२.समुदाय आरोग्य अधिकारी यांची कार्यालयीन वेळ सकाळी ८.३० ते सांय. ५.०० वाजेपर्यंत राहील.

३.समुदाय आरोग्य अधिकारी यांना आपत्कालीन परिस्थिती मध्ये कोणत्याही वेळी कर्तव्यावर हजर राहणे त्यांना बंधनकारक आहे.

४.समुदाय आरोग्य अधिकारी यांना Private Practice करता येणार नाही.

(डॉ.विजय कंदेवाड)
सहसंचालक तांत्रिक
राष्ट्रीय आरोग्य अभियान,मुंबई

प्रत माहितीस्तव -मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)